## Criterion 7 – Institutional Values and Best Practices

**7.1.9 Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

| Sr. No. | Program | Date |
|---|---|---|
| 1 | Book Publication " AjadiKaAmrutMohatsav-Bharat ke Jan JanKa Bharat Kehar Man KaParva" | 03-07-2022 |
| 2 | World Adivasi Din/ Kranti Din | 09-08-2022 |
| 3 | HarGharTiranga | 11-08-2022 |
| 4 | International Youth Day | 12-08-2022 |
| 5 | Flag Hosting and Rally | 13-08-2022 |
| 6 | International Organ Donation Day | 13-08-2022 |
| 7 | VibhajanVibhishikaSmruti Din | 14-08-2022 |
| 8 | Poster Competition on the occasion of AmritMahotsav | 15-08-2022 |
| 9 | SamuhaRashtragitGayan | 17-08-2022 |
| 10 | New Voter Registration | 24-08-2022 |
| 11 | Word Organ Donation Day | 13-09-2022 |
| 12 | Ozone Day | 16-09-2022 |
| 13 | SwatantrachaAmrutMahotsav Speech | 13-10-2022 |
| 14 | Financial Literacy Workshop | 17-01-2023 |
| 15 | Voter's Day | 25-01-2023 |
| 16 | IPR for Aspiring Minds | 03-02-2023 |

## Glimpses of Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens

1. **Book Publication " AjadiKaAmrutMohatsav-Bharat ke Jan JanKa Bharat Kehar Man KaParva"**



लोकशाही | जळगाव सोमवार दि.४ जुलै २०२२

**ऐनपूर महाविद्यालयात ऑनलाईन पुस्तक प्रकाशन**

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता.रावेर ✍ वार्ताहर

भारत स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूरच्या वतीने संपादित आझादी का अमृत महोत्सव भारत के जन- जन का, भारत के हर मन का पर्व या ग्रंथाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या शुभहस्ते ऑनलाईन प्रकाशन करण्यात आले.

पुस्तक प्रकाशन मनोगता वेळी कुलगुरूंनी पुस्तक प्रकाशन उपक्रमाचे कौतुक केले. तसेच स्वातंत्र्यासाठी आपल्या पूर्वजांनी खूप मोठा संघर्ष केला. त्या संघर्षाची माहिती आजच्या युवा पिढीला व्हावी त्यापासुन त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी असे उपक्रम राबविणे महत्वाचे असे मत मांडले. विद्यापिठामार्फत स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राबवित असलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामदास महाजन यांनी अध्यक्षीय भाषणात ग्रंथ संपादक मंडळाचे व शोधनिबंध लेखकांचे कौतुक केले. स्वांतत्र्यासाठी लढणाऱ्या महापुरूषांची माहिती आजच्या पिढीला कळावी यासाठी असे ग्रंथ निर्माण होणे गरजेचे आहे असे मत मांडले.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या विरांची वीरकथा आजच्या पिढीला कळावी त्यापासुन त्यांनी प्रेरणा घ्यावी. या हेतूने प्रेरित होऊन सदर ग्रंथ संपादित केल्याचे मत त्यांनी मांडले.

पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला प्रमुख अतिथी प्र.कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे (क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव.) भागवत पाटील, श्रीराम पाटील, संजय पाटील, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य दिपक पाटील, प्रा.सुनील कुलकर्णी व सर्व संचालक मंडळ ऐनपूर, तसेच संपादक मंडळ प्रा.डॉ.संदीप सांळुके, प्रा.अक्षय महाजन व प्रा.प्रदिप तायडे, शोधनिबंध लेखक, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.डॉ.के.जी.कोल्हे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.अक्षय महाजन यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.

2. **World Adivasi Din/ Kranti Din**



जळगाव तरुण भारत

]]]]]]] | 2022-08-10 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com

**ऐनपूर महाविद्यालयात आदिवासी दिन साजरा**

**रावेर :** तालुक्यातील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथे विद्यार्थी विकास विभाग राष्ट्रीय सेवा योजना विभाग व समान संधी केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक आदिवासी दिन व क्रांती दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी १८५७ पासून ते १९४२ पर्यंतच्या भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्याची माहिती दिली. भारतामध्ये राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तींना स्वातंत्र्य मिळावं त्यांना सामाजिक स्वातंत्र्य मिळावं जातिभेद नष्ट व्हावा याकरिता विविध थोर नेत्यांनी क्रांती केली. तसेच आदिवासी हे भारतातील मूलनिवासी आहेत व ते जल, जमीन आणि निसर्ग यांच्याशी एकरूप झालेले आहेत असे त्यांच्या व्याख्यानामध्ये सांगितले. प्रास्ताविक व प्रमुख वक्त्याचा परिचय कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी केला. बिरसा मुंडा यांनी आदिवासी लोकांना गुलामीतून मुक्त करण्यासाठी क्रांती केली असे त्यांच्या प्रास्ताविकामध्ये सांगितले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. व्ही. एन. रामटेके यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा.डॉ. विनोद रामटेके, प्रा.एस.पी. उमरीवाड प्रा.डॉ.डी.बी. पाटील, प्रा.डॉ.जे.पी.नेहेते, प्रा. प्रदीप तायडे, प्रा.अक्षय महाजन, प्रा. आर व्ही. भोळे, डॉ.पी.आर.गवळी, प्रा.एम.के.सोनवणे, प्रा. एच.एम.वाविस्कर, व प्रा. व्ही एच. पाटील यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला १२५ विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार समान संधी केंद्राचे समन्वयक प्रा.एस.पी.उमरीवाड यांनी मानले.

## 3. HarGharTiranga



दिव्य मराठी भुसावळ, बुधवार, २० जुलै २०२२

# तरुणांनी यशस्वी करावे हर घर तिरंगा अभियान

## सरदार पटेल कॉलेजचे वेबिनारमधून आवाहन

प्रतिनिधी | ऐनपूर

देशासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्यांचे परिश्रम, बलिदानाने देशाला स्वातंत्र्य मिळाले. आता हर घर तिरंगा जनजागृती अभियान सफल करण्याची जबाबदारी सर्व नवयुवकांची आहे. ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा झेंडा लावून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करावा, असे आवाहन ऐनपूर येथील सरदार पटेल महाविद्यालयाने आयोजित वेबिनारमधून झाले.

ऐनपूर (ता.रावेर) येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय व भुसावळ येथील संत गाडगेबाबा हिंदी महाविद्यालयाच्या माध्यमातून १९ जुलैला \'हर घर तिरंगा जनजागृती अभियाना'साठी एक दिवसीय वेबिनारचे आयोजन केले होते. त्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक सुनील कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले. त्यांनी अमर सेनानी व थोर नेत्यांचे आपल्याला सतत स्मरण राहावे. स्वातंत्र्याचा दैदिप्यमान इतिहास आपल्याला कळावा हेच या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे असे सांगितले. दुसरे प्रमुख वक्ते म्हसदी येथील स्व.अण्णासाहेब डी.आर.देवरे महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा.डॉ.जगदीश तोरवणे यांनी भारतीय ध्वज संहिता सांगितली. सोबतच तिरंग्याचा अपमान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ध्वज केव्हा फडकावला जातो ही माहिती दिली. प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी प्रास्ताविक केले. भुसावळ येथील प्राचार्य डॉ.रमेश जोशी यांनी अध्यक्षीय भाषणात हा कार्यक्रम आंतरविद्यापीठ कार्यक्रम म्हणून साजरा झाल्याचे सांगितले. त्यात जिल्ह्यातील प्रत्येक तरुणाने हर घर तिरंगा अभियान यशस्वी करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.विनोद रामटेके, आभार डॉ.सुधीर शर्मा यांनी मानले. एकूण २०८ विद्यार्थी, शिक्षक सहभागी होते.

## 4. International Youth Day



## 5. Flag Hosting and Rally




## 6. International Organ Donation Day



दैनिक **लोकशाही**

व्यक्त कल. तसच स्वातंत्र्य अमृत महोत्सव साजरा करावा


# ऐनपूर महाविद्यालयात आंतराष्ट्रीय महाअवयवदान दिन साजरा

**लोकशाही न्युज नेटवर्क**
**ऐनपूर, ता.रावेर** वार्ताहर

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे दि. १३ ऑगस्ट २०२२ या दिवशी आंतरराष्ट्रीय महाअवयवदान दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. के. जी.कोल्हे तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सिद्धेश पाटील व डॉ. विवेक पाटील, मेडीकल ऑफिसर, ऐनपूर प्राथमिक आरोग्य केंद्र हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. डी. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. मार्गदर्शकांनी अवयव दानाचे प्रकार, त्याचे महत्व व वेगवेगळ्या अवयव प्रत्यारोपण विषयी माहिती सांगितली. तसेच अध्यक्षीय भाषणात डॉ. के. जी. कोल्हे यांनी अवयव दानाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील यांनी तर डॉ. एस. बी. पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील तसेच सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाला एकूण ८५ विद्यार्थी हजर होते.

Lokshahi Edition
Aug 15, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com




## 7. VibhajanVibhishikaSmruti Din

दैनिक **महाराष्ट्र सारथी**

15 Aug 2022 - Page 5

# ऐनपूर महाविद्यालयात विभाजन विभिषिका स्मृती दिनानिमित्त श्रद्धांजली

**बलिदान केलेल्यांची स्मृती ठेवावी : डॉ.जे.बी.अंजने**

**महाराष्ट्र सारथी वृत्तसेवा**
**ऐनपुर । प्रतिनिधी :**



येथील सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालयात विभाजन विभिषिका स्मृती दिनानिमित्त श्रध्दांजली कार्यक्रम घेण्यात आला १४ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण भारतभर विभाजन विभीषिका स्मृती दिवस साजरा करण्याचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांनी १४ ऑगस्ट २०२१ रोजी गॅझेट काढून आवाहन केले आहे. भारताला जे स्वातंत्र्य मिळाले आहे ते सहजसहजी मिळालेले नसून ,त्यासाठी अनेक तरुणांनी, महिलांनी, लहान मुलांनी आपल्या प्राणाची आहुति दिलेली आहे.१५ ऑगस्ट ला भारत देश स्वतंत्र झाला ,परंतु त्याचे दोन तुकडे पाडण्यात इंग्रज यशस्वी झाले. १४ ऑगस्ट ला पाकिस्तान स्वतंत्र झाला. या विभाजनाच्या वेळी अनेक लोक विस्थापीत झाले,त्यावेळी जो नरसंहार झाला त्यात अनेक महिला ,पुरुष यांचा नाहक बळी गेला.रावळपिंडी, लाहोर हून प्रेतांनी खचाखच भरलेल्या ट्रेन भारतात येऊ लागल्या.अनेक कुटुंबाची वाताहत झाली. अशा निष्पाप, निरागस शाहिद झालेल्या लोकांचे स्मरण १४ ऑगस्ट या दिवशी करून त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करूयात असे विचार सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी स्वातंत्र्याच्या पूर्व दिनी विद्यार्थ्यांसमोर मांडले. यावेळी विद्यार्थी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## 8. Poster Competition on the occasion of AmritMahotsav

दैनिक लोकशाही

# ऐनपूर महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त पोस्टर स्पर्धा

**लोकशाही न्युज नेटवर्क**
**ऐनपूर, ता.रावेर** ✍ वार्ताहर

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी.अंजने यांनी केले. यात २८ स्पर्धकांनी सहभाग घेतला.

या स्पर्धेत प्रज्ञा मनोज जाधव द्वितीय वर्ष कला हिने प्रथम क्रमांक, शिवानी अनिल चौधरी द्वितीय वर्ष विज्ञान हिने द्वितीय क्रमांक, राजेश्वरी संजय महाजन व श्रेयल रविंद्र पाटील प्रथम वर्ष विज्ञान यांना विभागुन तृतीय क्रमांक व जान्हवी योगेश महाजन हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला.

सदर स्पर्धसाठी डॉ एस.ए. पाटील व डॉ एस. एन. वैष्णव यांनी परिक्षक म्हणून तर डॉ. जे. पी. नेहेते व हेमंत बाविस्कर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले .स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी मार्गदर्शन केले.



स्पर्धा यशस्वीतेसाठी भास्कर पाटील, सचिन महाजन, ऋषिकेश महाजन, सुजित चौधरी, सौरभ पाटील, हर्षल पाटील, अनिकेत पाटील यांनी मेहनत घेतली.

Lokshahi Edition
Aug 18, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com



## 9. SamuhaRashtragitGayan

□□□□□ □□□□□□□ | 2022-08-20 | Page- 6
epaper.tarunbharatjalgaon.com



# ऐनपूर महाविद्यालयात समूह राष्ट्रगीत गायन

**रावेर :** तालुक्यातील ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत स्वराज्य महोत्सव उपक्रमाचा भाग म्हणून १७ रोजी ११ वाजता सामुहिक राष्ट्रगीत गायन कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमात महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक, विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी.पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.एस.बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील, क्रीडा संचालक डॉ. एस. एन. झोपे, प्रा. संकेत चौधरी, विद्यार्थी आयुष पाटील, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## 10. New Voter Registration

जळगाव तरुण भारत

□□□□□□□ | 2022-08-25 | Page- 7
epaper.tarunbharatjalgaon.com

### ऐनपूर महाविद्यालयात नवीन मतदार नोंदणी अभियानास प्रारंभ



**रावेर :** तालुक्यातील ऐनपूर येथील महाविद्यालयात नवीन मतदार नोंदणी अभियानाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नवीन मतदार नोंदणी फॉर्मचे वाटप करण्यात आले. डॉ.जे.बी.अंजने यांनी सशक्त लोकशाहीसाठी सर्वांनी मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला पाहिजे. या उपक्रमात ज्या विद्यार्थ्यांचे नांव मतदार यादीत नोंदणी नसेल अशा विद्यार्थ्यांनाकडुन नवीन मतदार नोंदणी फॉर्म भरून घेतले. या उपक्रमासाठी नोडल अधिकारी प्रा.हेमंत वाविस्कर, डॉ. विनोद रामटेके, डॉ.सतीश वैष्णव, डॉ. जयंत नेहेते, गोपाल पाटील, विक्रम राठोड, सुलेमान तडवी तहसील कार्यालय रावेर यांनी परिश्रम घेतले.






## 11. World Organ Donation Day



दैनिक लोकशाही

व्यक्त कर. तसच स्वातंत्र्य अमृत महोत्सव साजरा करावा


# ऐनपूर महाविद्यालयात आंतराष्ट्रीय महाअवयवदान दिन साजरा


लोकशाही न्युज नेटवर्क

ऐनपूर, ता.रावेर ✍ वार्ताहर

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे दि. १३ ऑगस्ट २०२२ या दिवशी आंतरराष्ट्रीय महाअवयवदान दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. के. जी.कोल्हे तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सिद्धेश पाटील व डॉ. विवेक पाटील, मेडीकल ऑफिसर, ऐनपूर प्राथमिक आरोग्य केंद्र हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. डी. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. मार्गदर्शकांनी अवयव दानाचे प्रकार, त्याचे महत्व व वेगवेगळ्या अवयव प्रत्यारोपण विषयी माहिती सांगितली. तसेच अध्यक्षीय भाषणात डॉ. के. जी. कोल्हे यांनी अवयव दानाविषयी जनजागृती करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील यांनी तर डॉ. एस. बी. पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील तसेच सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाला एकूण ८५ विद्यार्थी हजर होते.


Lokshahi Edition
Aug 15, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com


## 12. Ozone Day




# ऐनपूर महाविद्यालयात जागतिक ओझोन दिवस साजरा


लोकशाही न्युज नेटवर्क

ऐनपूर, ता.रावेर ✍ वार्ताहर


सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात दि.१६ सप्टेंबर २०२२ रोजी रसायनशास्त्र मंडळाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या हस्ते करण्यात आले. सदर रसायनशास्त्र मंडळा तर्फे जागतिक ओझोन दिवस साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी भूषविले. प्रमुख मार्गदर्शक डॉ.सतीश एन.वैष्णव हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्राचार्य. डॉ. जे.बी.अंजने यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात डॉ.जयंत नेहेते, रसायनशास्त्र मंडळाचे समन्वयक यांनी मंडळाचे ध्येय व उद्दिष्टे सांगून, सदर मंडळ विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र विषयात आवड निर्माण होण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे असे सांगितले. कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले डॉ. सतिश वैष्णव यांनी ओझोनच्या थराची गरज का आहे हे समजावून सांगितले तसेच त्याबद्दल जागरुकता निर्माण व्हावी यासाठी दरवर्षी १६ सप्टेंबर रोजी जागतिक ओझोन दिन साजरा केला जातो असेही ते म्हणाले. ओझोन थरामुळे पृथ्वी आणि त्यावर राहणाऱ्या सर्व जीवांचे सूर्याच्या हानिकारक किरणांपासून संरक्षण होते. पर्यावरणाचे रक्षण करणे व त्याची योग्य प्रकारे निगा राखणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. क्लोरोफ्लुरोकार्बन या हानिकारक पदार्थांचा वापर केल्याने ओझोनचा थर नष्ट होतो म्हणून या पदार्थाचा वापर कमी केला पाहिजे. ओझोनच्या थरातील छिद्रामुळे जागतिक तापमान वाढीची समस्या निर्माण झाली आहे असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पृथ्वीसाठी ओझोनचा थर हा अत्यंत आवश्यक आहे. पण मानवनिर्मित प्रदूषणामुळे हा थर हळूहळू नाहीसा होऊ लागला आहे. हा थर वाचवायचा असेल तर आपण जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करून त्याचे संगोपन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयंत नेहेते यांनी केले तर आभार प्रा. सुनील इंगळे यांनी मानले. सदर कार्यक्रमाला एकूण ६२ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.जे.पी.नेहेते, डॉ.सतीश वैष्णव आणि प्रा. सुनील इंगळे, प्रा.संकेत चौधरी, पूजा कुमावत, काजल पाटील, प्रा.अंकुर पाटील यांनी परिश्रम घेतले.



### 13. SwatantrachaAmrutMahotsav Speech:

तरुण भारत

जळगाव

□□□□□□□ | 2022-10-15 | Page- 6

epaper.tarunbharatjalgaon.com

## ऐनपूर महाविद्यालयात व्याख्यान



**रावेर :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग आणि ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या विषयावर प्रताप महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.एल.ए.पाटील यांचे व्याख्यान झाले. प्रास्ताविक ऐनपूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.बी. अंजने यांनी केले. संस्थेचे चेअरमन श्रीराम पाटील, सचिव संजय पाटील, संचालक कैलास पाटील, पी. आर. चौधरी, डॉ. सतिश पाटील, रवींद्र पाटील, पी. एम. पाटील, आर. एस. पाटील, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ.के.जी. कोल्हे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. एस. ए. पाटील यांनी केला. आभार प्रा. डॉ.व्ही.एन. रामटेके यांनी मानले.

### 14. Financial Literacy Workshop

## ऐनपूर महाविद्यालयात वित्तीय साक्षरता कार्यशाळा



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता रावेर** प्रतिनिधी

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात वित्तीय साक्षरता कार्यशाळा आयोजित करण्यात आली. युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा रावेर येथील शाखा व्यवस्थापक श्री प्रदीप राठोड यांनी बँकेच्या विविध योजना तसेच, एटीएम कार्ड, ऑनलाईन बॅन्किग, मोबाईल बॅन्किग,नेट बँकिंग बाबत माहिती दिली. बॅन्क पुरवित असलेल्या सेवा,कर्ज योजना विमा इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ सतिश वैष्णव यांनी केले. स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी केले. बॅन्केच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांनी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन अंतर्गत गुणवत्ता हमी समिती मार्फत करण्यात आले. आभार प्रा महेन्द्र सोनवणे यांनी मानले.र्यशाळा आयोजित करण्यात आली. युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा रावेर येथील शाखा व्यवस्थापक श्री प्रदीप राठोड यांनी बँकेच्या विविध योजना तसेच, एटीएम कार्ड, ऑनलाईन बॅन्किग, मोबाईल बॅन्किग,नेट बँकिंग बाबत माहिती दिली. बॅन्क पुरवित असलेल्या सेवा,कर्ज योजना विमा इत्यादी विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ सतिश वैष्णव यांनी केले.स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी केले. बॅन्केच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांनी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन अंतर्गत गुणवत्ता हमी समिती मार्फत करण्यात आले. आभार प्रा महेन्द्र सोनवणे यांनी मानले.

जळगाव बुधवार दि. १८ जानेवारी २०२३

## 15. Voter's Day

जळगाव शनिवार
दि.२८ जानेवारी २०२३

# लोकशाही

## जागृत मतदार बळकट लोकशाहीचे प्रतिक : डॉ जे.बी.अंजने



**लोकशाही न्युज नेटवर्क**
**ऐनपूर, ता.रावेर** ✍ वार्ताहर

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने होते.

या कार्यक्रमात प्रथम प्रा.व्ही.एच.पाटील यांनी सर्वांना शपथ दिली. मतदार दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यात प्राम ख्याने निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा इ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यात निबंध स्पर्धात प्रथम क्रमांक शितल रजाने, द्वितीय क्रमांक नेहा महाजन तर तृतीय क्रमांक आर्या पाटील यांना मिळाला तसेच घोषवाक्य स्पर्धात प्रथम क्रमांक नेहा महाजन, द्वितीय क्रमांक विभुषा पाटील तर तृतीय क्रमांक मेहल पाटील यांना मिळाला तसेच चित्रकला स्पर्धात प्रथम क्रमांक प्रज्ञा जाधव व द्वितीय क्रमांक नेहा महाजन यांना मिळाला आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी बळकट लोकशाहीसाठीं जागृत मतदार असणे आवश्यक असते तसेच मतदार दिनाचे महत्त्व पटवून सांगितले.

सदर स्पर्धसाठी डॉ.के.जी.कोल्हे, डॉ.एस.ए. पाटील व डॉ.जे.पी.नेहेते, प्रा.व्ही.एच.पाटील यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. तसेच डॉ.एस.एन. वैष्णव व हेमंत बाविस्कर यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन अलताब पटेल यांनी केले स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## 16. IPR for Aspiring Minds



दैनिक
लोकशाही

# ऐनपूर पटेल महाविद्यालयात बौद्धिक संपदा हक्क या विषयावरील परिसंवाद

लोकशाही न्युज नेटवर्क
ऐनपूर, ता.रावेर ✍ वार्ताहर

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे सरदार वल्लभभाई पटेल कला आणि विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर येथील अंतर्गत गुणवत्ता हमी (आय. क्यू. ए. सी.) व ज्ञानस्त्रोत केंद्र (ग्रंथालय) यांच्या संयुक्त विद्यमानाने ह्नबौद्धिक संपदा हक्कह्न ह्नअुरीशपर्शीा `प खर्पीशश्रश्रशर्लीरिश्र झीर्शिीा् ठळसहीा र्यी ीहश ओीळिीळपस चळपवीह्न या विषयावर दिनांक ०३ फेब्रुवारी २०२३ रोजी एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजन सचिव डॉ. एस. एन. वैष्णव यांनी केले त्यात त्यांनी बौद्धिक संपदा हक्क याची प्रासंगिकता तसेच त्याची व्याप्ती याविषयी माहिती देऊन हे परिसंवादात सहभागी मान्यवरांना तसेच विद्यार्थ्यांना कश्या प्रकारे उपयोगी ठरणार आहे या विषयी सांगितले.

परिसंवादासाठी मुख्य वक्ते म्हणून रावेर येथील व्ही.एस.नाईक महाविद्यालयाचे प्रा.डॉ.जी.आर. ढेंबरे यांचा परिचय डॉ. एस. एन. वैष्णव यांनी करून दिला. आपल्या व्याखानात प्रा. डॉ. जी. आर. ढेंबरे यांनी सर्वप्रथम सादरीकरणाच्या पहिल्या सत्रात बौद्धिक संपदे विषयी सर्वसाधारण माहितीचे विवेचन केले. तसेच बौद्धिक संपदाशी निगडीत विविध पैलूवर प्रकाश टाकला. व्याख्यानात त्यांनी विविध दाखले देत बौद्धिक संपदा आणि त्याचे उदाहरणासहीत स्पष्टीकरण दिले. सादरीकरणाच्या दुस ऱ्या सत्रात प्रा. डॉ. डी. बी. पाटील यांनी ह्नबौद्धिक संपदा आणि स्टार्टअपह्न विषयी मार्गदर्शन केले. यात त्यांनी व्यवसाय आणि स्टार्टअप यामधील काय फरक आहे. कोणकोणत्या मुलभूत घटक आहेत ज्या एका व्यवसाय आणि स्टार्टअप या वेगळेपण दर्शवते. यानंतर त्यांनी पेटंट व ट्रेडमार्क विषयी माहिती देऊन प्रत्यक्ष पेटंट नोंदणी पर्यंतची माहिती दिली. तसेच या संदर्भात असलेले विविध कायदेविषयक तरतुदी व संशोधकाला मिळणा ऱ्या विविध संधी या बद्दल सखोल मार्गदर्शन केले. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तराच्या काळात तज्ज्ञांशी हितगुज झाली व त्यांच्या मनात असलेल्या शंका त्यांनी तज्ज्ञांसमोर



मांडल्या यावर मार्गदर्शकांनी सखोल असे मार्गदर्शन केले. परीसंवाचा समारोप प्रसंगी सहभागी प्राध्यापकांनी आपली मनोगते व्यक्त करताना सांगितले की वक्त्यांनी आपल्या सादरीकरणात दोन्ही सत्रात खूप छान माहिती दिली. कार्यक्रमात शेवटच्या सत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ जे बी अंजने यांनी समारोपप्रसंगी भाषणात ह्नबौद्धिक संपदा हक्कह्न या विषयाचे परिसंवाद आयोजनाबद्दल चे महत्व सांगितले तसेच या संबंधी असलेल्या शिखर संस्था व त्यांचा ह्नबौद्धिक संपदा हक्कह्न या बद्दल असलेले कार्य या बद्दल विवेचन केले. तसेच बौध्दिक संपदा हक्क याविषयी विद्यार्थी, संशोधक, व्यवस्थापक यांना जाणिव होण्याची गरज आहे.

या एक दिवसीय सेमीनारला एकूण १०७ सहभागी यांची नोंद झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाचे प्रमुख प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने, कार्यक्रमाचे सचिव डॉ.एस.एन. वैष्णव, समन्वयक डॉ.एस.एस.साळुंके, तसेच समिती सदस्य म्हणून प्रा.डॉ.के.जी.कोल्हे, प्रा.एच.एम.बाविस्कर, डॉ.जे. पी.नेहेते डॉ.व्ही.एन.रामटेके, डॉ.आर.व्ही.भोळे, डॉ.पी. आर.महाजन, प्रा.एस.आर.इंगळे, डॉ.एस.ए.पाटील तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.एस.एस.साळुंके यांनी तर तांत्रिक बाजू डॉ.जे.पी.नेहेते यांनी पार पाडली. यानंतर प्रा.एच.एम.बाविस्कर यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे तथा कार्यक्रमास लाभलेले तज्ञ मार्गदर्शक यांचे आभार मानले.

Main Edition
Feb 4, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

Sardar V.P Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon